**सांगली जिल्हा पुनर्नियुक्त माजी सैनिकांच्या ECHS व  सेवा बंद केल्यानंतर शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य चे वतीने निवेदन व सविस्तर चर्चा**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की सांगली जिल्हातील पुनर्नियुक्त माजी सैनिक यांना ECHS कार्यालय सांगली यांचे कडुन ECHS सभासदांना वैद्यकिय सेवा नाकारण्यात आल्याचे जिल्हातील पुनर्नियुक्त माजी सैनिकांन कडुन तक्रारी प्राप्त झालेल्या त्या अनुषंगाने आज दिनांक 10/10/2022 सोमवार ला शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य चे वतीने सर्व सन्मानिय माननीय राज्याध्यक्ष श्री बाजीरावजी देशमुख साहेब, श्री राजीवजी जामोदकर साहेब, मी संतोष मलेवार सरचिटणीस, श्री बाळासाहेब जाधव चिटणीस,मुख्य सल्लागार श्री कमलाकर शेटे साहेब श्री सुरेश माने साहेब,विलास घाडगे साहेब श्री भुजबळ साहेब नवनिर्वाचित विभागीय उपाध्यक्ष श्री पठाण सर श्री भिल्लारे सर श्री सार्वे सर श्री कोरपे सर, श्री बिराजदार सर तसेच सर्व बाबीचे नियोजन करणारे श्री दिपक पाटील माजी चिटणीस यांचे समेत संचालक ECHS, विभागीय संचालक ECHS यांचेशी याविषयावर सविस्तर चर्चा केली. याबाबत सांगली जिल्हा चे ECHS अधिकारी कमान्डोर श्री दिपक पाटील सेवानिवृत्त यांचे बाबतची तक्रार करण्यात आली यानंतर सदर विषयांकित प्रकरणी सांगली जिल्हा चे अनेक तक्रारी आलेल्या आहेत.

तसेच आजच महाराष्ट्रातील ECHS सर्वांना सयुक्तिक पत्राद्वारे कुठल्याही माजी सैनिकांचे उपचार पुढिल आदेशा पर्यंत थांबवु नये याबद्दलचे निर्देशित करण्याचे कळविले आहे.

तसेच मॅस्को मध्ये कार्यरत माजी सैनिक यांचे बाबत सुध्दा त्यांना उपचार तात्काळ सुरू करण्याचे पत्र निर्गमित करण्यात आल्याचे कळविले आहे.

आपला
संतोष मलेवार सरचिटणीस शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य